## रे.दि.मु.नं. ३८१/१९९३ मधील नि.क्र. ८४ खालील आदेश

### दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे अर्ज.

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा मिळकतीची मोजणी करणेकरीता उप अधिक्षक, भूमी अभिलेख, वाळवा, इस्लामपूर यांची नेमणूक कमिशनर म्हणून व्हावी याकरीता दिलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, मुळ दावा दि. ६.३.२००७ रोजी मंजूर करण्यात आला. त्या निर्णया विरुद्ध प्रतिवादीनी रे.दिवाणी अपिल नं. ३३/२००७ दाखल केले होते. त्याचा निर्णय २६.४.२०१७ रोजी झाला व दावा मुळ न्यायालयाकडे फेर चौकशीसाठी पुन्हा परत पाठविण्यात आला. मा. जिल्हा न्यायालयाने रे.दि.अ.नं. ३३/२००७ मध्ये सर्व्हे नं. ६६२ ची मोजणी नि.क्र. २२ च्या गुणाकार बुक व नि.क्र. ६६ चा फाळणी नकाशा विचारात घेऊन मोजणी करावी असा आदेश पारित केलेला आहे. मा. जिल्हा न्यायालयाने केलेल्या आदेशानुसार सर्व्हे नं. ६६२ ची फेर मोजणी होणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादीनी अर्जास विरोध करुन त्यांचे म्हणणे नि.क्र. ८५ ला दिले आहे. प्रतिवादीनी अर्जातील मजकूर नाकारला आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे की, नि.क्र. २२ चे गुणाकर बुक व नि.क्र. ६६ च्या फाळणी नकाशानुसार मोजणी करण्यासाठी वादीने रेकॉर्ड दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे. प्रतिवादीच्या वारसांबाबत वादीने पूर्तता केलेली नाही. त्यामुळेही मयत प्रतिवादीच्या विरुद्ध दिलेला प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही. सबब अर्ज रद्द करावा.

४. प्रतिवादीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे वकिल गैरहजर.

५. मा. जिल्हा न्यायालयाने रे.दि.अ.नं. ३३/२००७ मध्ये पारित केलेला आदेश पाहिला. मा. जिल्हा न्यायालयाने सर्व्हे नं. ६६२ ची फेर मोजणी करणेकरीता भूकरमापकाची नेमणूक कमिशनर म्हणून करावी व सदरची मोजणी करत असताना नि.क्र. २२ चे गुणाकार बुक तसेच नि.क्र. ६६ चा फाळणी नकाशा विचारात घेण्यात यावा असा आदेश पारित केल्याचे दिसून येते.

६. प्रतिवादीनी जरी अर्जास विरोध केला असला तरी रे.दि.अ.नं. ३३/२००७ प्रतिवादीने दाखल केलेला होता. मा. जिल्हा न्यायालयाने अपिलामध्ये केलेल्या आदेशाची पूर्तता करणेकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. मा. जिल्हा न्यायालयाने रेकॉर्ड दुरुस्तीबाबत कोणताही आदेश पारित केलेला नाही किंवा रेकॉर्ड दुरुस्ती केल्यानंतर मोजणी करावी, असा आदेश पारित केला नाही. त्यामुळे वादीने मागणी केल्याप्रमाणे सर्व्हे नं. ६६२ ची मोजणी करणेकरीता उप अधिक्षक, भूमी अभिलेख यांचे कार्यालयातील भूकरमापकाची नेमणूक कमिशनर म्हणून होणे आवश्यक आहे. म्हणून पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

अर्ज मंजूर करण्यात येतो.

उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालयातील भूकरमापकांची नेमणूक कमिशनर म्हणून करण्यात येते.

भूकरमापकांनी वाळवा येथील सर्व्हे नं. ६६२ ची मोजणी नि.क्र. २२ ला हजर केलेले गुणाकार बुक व नि.क्र. ६६ ला हजर केलेला फाळणी नकाशा विचारात घेऊन करावी.

कमिशनर यांनी  सर्व्हे  नं. ६६२ च्या अभिलेखाप्रमाणे हद्दी, वहिवाटीप्रमाणे हद्दी व अतिक्रमण दिसून आल्यास त्याचे निश्चित क्षेत्र दर्शविणारा नकाशा तयार करुन अहवालासोबत सादर करावा.

कमिशनर यांनी कमिशनच्या वेळी वादी, प्रतिवादींचे म्हणणे विचारात घेऊन मिळकतीमध्ये असणारी झाडे, बांधकाम इत्यादी बाबी दर्शविणारा वस्तुस्थितीदर्शक नकाशा न्यायालयात सादर करावा.

वादीनी कमिशनसाठी लागणारी फी परस्पर उप अधिक्षक, भूमी अभिलेख वाळवा इस्लामपूर यांचे कार्यालयात जमा करुन, त्याची पावती न्यायालयात सादर करावी.

कमिशनपत्र पाठविणेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता वादीने पुढील तारखेपर्यंत करावी.

येणेप्रमाणे कमिशनपत्र पाठविण्यात यावे.

सही/-

इस्लामपूर. (सु.रा. पाटील)

दिनांक १२/१२/२०१७. दिवाणी न्यायाधिश व.स्तर, इस्लामपूर.